**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक – 21.05.2024** **वार–मंगळवार**

---

**बारावी**

इयत्ता बारावीच्या परीक्षेत 93 पूर्णांक 37 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. गेल्यावर्षीपेक्षा यंदा 2 पूर्णांक 12 टक्क्यांनी निकाल वाढला आहे. मुलींच्या उत्तीर्णतेचं प्रमाण मुलांपेक्षा सुमारे चार टक्क्यांनी अधिक म्हणजे 95 पूर्णांक 44 टक्के आहे. कोकण विभागाची टक्केवारी सर्वाधिक म्हणजे 97 पूर्णांक 51 टक्के असून सर्वात कमी निकाल मुंबई विभागाचा 91 पूर्णांक 15 टक्के लागला आहे. पुणे विभागाचा निकाल 94 पूर्णांक 44 टक्के आहे. शाखानिहाय निकालात यंदा विज्ञान शाखेचे विद्यार्थी सर्वाधिक 97 पूर्णांक 82 टक्के उत्तीर्ण झाले आहेत.

**अपघात**

कल्याणीनगर वाहन अपघात प्रकरणी आरोपी वेदांत अग्रवाल याचे वडील आणि पुण्यातील बांधकाम व्यावसायिक विशाल अग्रवाल यांना पुणे पोलिसांनी अटक केली आहे. अल्पवयीन मुलाला बार आणि पबमध्ये प्रवेश देणाऱ्या हॉटेल कोझीचे मालक प्रल्हाद भुतडा, व्यवस्थापक सचिन काटकर, हॉटेल ब्लॅकचे मालक संदीप सांगळे, बार व्यवस्थापक जयेश बोनकर यांच्याविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अल्पवयीन मुलानं चालविलेली गाडी केवळ विनाक्रमांकच नव्हती तर ही गाडी विनानोंदणीच रस्त्यावर धावत असल्याची माहिती समोर आली आहे.

**स्वारगेट**

मोसमी पूर्व पावसामुळं पुण्यातील स्वारगेट एस टी बस स्थानकाच्या आवारात दरवर्षीप्रमाणं यंदाही मोठ्या प्रमाणावर पाणी साठू लागलं आहे. खाद्य पदार्थांच्या अनधिकृत स्टॉलच्या विळख्यात सापडलेल्या आणि दररोज हजारो प्रवासी तसंच शेकडो एस टी गाड्यांचा वावर असलेल्या या स्थानकाला सध्या अतिशय बकाल स्वरूप प्राप्त झालं आहे.

**सीएनजी**

गेल्या काही दिवसांपासून पुण्यात होत असलेल्या सीएनजीच्या पुरवठ्यात अचानक कपात झाली असून त्यामुळं वाहनांच्या मोठ्या रांगा लागत आहेत. सीएनजीचा पुरवठा पूर्ववत कधी होणार याबद्दलची अधिकृत माहिती कोणाकडूनही दिली जात नसल्यानं वाहन चालक त्रासून गेले आहेत.

**फलक**

पुणे शहरात स्ट्रक्चरल ऑडीटच्या अहवालानंतरही अधिकृत फलक धोकादायक असल्याचं निदर्शनास आल्यास आयुक्तांच्या अधिकारात ते फलक उतरविण्यात येतील. तसंच पुढील पंधरा दिवसांत सर्व अनधिकृत फलक काढून टाकण्यात येतील, असं महापालिका आयुक्त राजेंद्र भोसले यांनी सांगितलं. मागील आठवडाभरात महापालिकेनं सत्तरहून अधिक अनधिकृत फलक उतरवले मात्र त्यांचे लोखंडी सांगाडे अद्यापही जागेवरच आहेत. अनेक ठिकाणी फलक उभारण्यासाठी केलेला पाया अत्यंत तकलादू असल्याचं निदर्शनास आलं आहे.

**खते**

राज्यात यंदाच्या 2024-25 च्या खरीप हंगामात 48 लाख टन खत पुरवठयाचं नियोजन प्रस्तावित आहे. त्यामध्ये केंद्र सरकारनं महाराष्ट्राला 45 लाख 53 टन खत पुरवठयाचं नियोजन मंजूर केलं आहे. यंदा खताच्या किंमतीत कोणतीही वाढ करण्यात आली नसल्याची माहिती पुणे कृषी संचालक विकास पाटील यांनी दिली.

**शेतकरी-कंपनी**

पुण्यातील भोर तालुक्यात इंद्रायणी, आंबे मोहोर आणि हातसडीचा तांदूळ, नाचणी, हळद पावडर, हापूस, केशर आंबे आणि भाजीपाला शेतकरी ते ग्राहक विक्री केंद्राचं उद्घाटन करण्यात आलं. आत्मा अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या या योजनेतर्गंत भोर तालुक्यातील 10 शेतकरी गटांची मिळून एक शेतकरी उत्पादक कपंनी स्थापन करण्यात आली आहे.

**औषधालय**

केंद्र सरकारी आरोग्य योजनेच्या पुणे विभागातर्फे कोथरूड, हडपसर, कात्रज, पिंपरी इथं नवीन औषधालय सुरू करण्यासंबंधीचं पत्र केंद्रीय आरोग्य मंत्रालयाला पाठवण्यात आलं आहे. सध्या सीजीएचएसची पुणे विभागात दहा औषधालयं आहेत.

**भरतनाट्य**

भरत नाट्य संशोधन मंदिराच्या अध्यक्षपदी पांडुरंग मुखडे, तर कार्याध्यपदी अभय जबडे यांची फेरनिवड करण्यात आली आहे. संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत 2024-25 या वर्षासाठी कार्यकारिणी निवडण्यात आली. संस्था स्थापनेच्या 130 व्या वर्षानिमित्त संस्थेद्वारे येत्या वर्षात 130 सांस्कृतिक कार्यक्रम करण्याचा मानस आहे, असं मुखडे यांनी सांगितलं.

**पुरस्कार**

महामाता रमामाई भीमराव आंबेडकर यांच्या 90व्या स्मृतिदिनानिमित्त रमाईरत्न स्मृती पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. न. म. जोशी आणि शांताई संस्थेच्या अध्यक्षा रश्मी कांबळे यांना येत्या 26 तारखेला पुण्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

**अभया**

वंचित विकास संचालित 'अभया' हा एकल महिलांच्या मैत्रीगटाचा दशकपूर्ती सन्मान सोहळा येत्या शनिवारी 25 तारखेला पुण्यात आयोजित करण्यात आला आहे. परिस्थितीशी दोन हात करुन मार्ग काढणाऱ्या स्त्रियांना या सोहोळ्यात सन्मानित करण्यात येणार आहे, अशी माहिती वंचित विकासच्या कार्यवाह संचालक मीना कुर्लेकर यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

**डायलिसीस**

पुणे महापलिकेच्या आरोगय विभागाच्या डायलिसिस सेंटरमध्ये आतापर्यंत 64 हजार 387 रूग्णांनी अत्यल्प शुल्कामध्ये डायलिसिसचा लाभ घेतला आहे, अशी माहिती पुणे महापालिका आरोग्य प्रमुख डॉक्टर भगवान पवार यांनी दिली.

**नाले**

पुणे शहराच्या विविध भागात नाले स्वच्छतेची 90 टक्के पूर्ण झाली असल्याचं महापालिकेचे आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी सांगितलं. शहरात सुमारे 350 किलोमीटरचे नाले आणि 500 किलोमीटरची गटारं आहेत.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**